पालघर जिल्ह्यातील अर्नाळा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१५२/२०१५, १५५/२०१५, १५७/२०१५, १५८/२०१५ मधून उद्भवणा-या मा.सत्र न्यायालय, वसई व मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे न्यायालयीन प्रकरणांमध्ये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या ॲड. श्री.राकेशकुमार सिंग यांना शासकीय दराने फी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसपीपी ०८१७/प्र.क्र.२०९/पोल-१०

गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मुंबई-४०० ०३२
दिनांक : २२ जानेवारी, २०१८

संदर्भ :- **शासन अधिसूचना, विधी व न्याय विभाग क्र. एसपीपी २०१७/यु.ओ.आर.६७/ डी-१४, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७.**

शासन निर्णय:

पालघर जिल्ह्यातील अर्नाळा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१५२/२०१५, १५५/२०१५, १५७/२०१५, १५८/२०१५ मधून उद्भवणा-या न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाच्या वतीने कामकाज पहाण्यासाठी श्री.राकेशकुमार सिंग यांची विधी व न्याय विभागाच्या वरील संदर्भाधीन दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७ च्या अधीसूचनेद्वारे विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी ॲड.श्री.राकेश सिंग यांना शासन निर्णय विधि व न्याय विभाग, क्रमांक मिटींग - २०११/(२४९)/डी-१४, दिनांक १५.०२.२०१४ च्या शासन निर्णयात नमूद केलेली शासकीय फी अदा करण्यास शासन मान्यता येत आहे.

२. परिणामकारक सुनावणीचे दिवस संबंधीत प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा अधिका-याकडून प्रमाणित करुन घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच, प्रस्तुत प्रकरणी ॲड.श्री.राकेश सिंग यांना शासकीय फी व्यतिरीक्त अन्य कोणतीही फी वा भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

३. यासाठी येणारा खर्च या विभागाच्या मागणी क्र.बी-१, २०५५ पोलीस - (००) १०९, जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस दल - (२०५५ ०१६८) - २८ व्यावसायिक सेवा या लेखाशीर्षाखालील त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात येईल.

४. हा शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक मिटींग - २०११/(२४९)/डी-१४, दिनांक १५.०२.२०१४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२३११५१२२९८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh Appaji Saste

Digitally signed by Dinesh Appaji Saste
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a49495d0d4b31e36ff1d612a85453ca984b74e28fd6f99cdf66e3e499969e942, cn=Dinesh Appaji Saste
Date: 2018.01.23 11:55:22 +05'30'

(दिनेश आ.सस्ते)
कार्यासन अधिकारी,गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस अधीक्षक, पालघर.
३. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई .
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६. ॲड.श्री.राकेश सिंग (पोलीस अधीक्षक, पालघर यांचेमार्फत)
७. विधी व न्याय विभाग (का १४), मंत्रालय, मुंबई.
८. विधी व न्याय विभाग (ए/ब्रँच), मंत्रालय, मुंबई.
९. वित्त विभाग (व्यय- ७), मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती (पोल-१०).